आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१२ जानेवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि युरोपियन संघातलं मुक्त व्यापार करार महिनाअखेर पूर्ण होण्याची शक्यता, जर्मनीबरोबर १९ सामंजस्य करार

- जगभरात निर्माण होत असलेल्या संधीचा लाभ घेण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं देशातल्या तरुण वर्गाला आवाहन

- राज्यातल्या जिल्हा परिषद निवडणुका १५ फेब्रुवारीपर्यंत घेण्याची मुभा निवडणूक आयोगाला देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना आगाऊ रक्कम द्यायला राज्य निवडणूक आयोगाची मनाई

**आणि**

- चांदी किलोमागे १४ हजार रुपयांनी महाग, शेअर बाजारातही तेजी

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन संघातला मुक्त व्यापार करार या महिनाअखेर पूर्ण हो◌ेऊ शकतो अशी शक्यता जर्मनीचे चान्सलर फ्रेडेरिक मर्झ यांनी आज व्यक्त केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत अमबादमध्ये द्विपक्षीय चर्चेनंतर दिलेल्या संयुक्त निवेदनात ते बोलत होते. मर्झ यांच्या भारत दौऱ्यादरम्यान आज भारत आणि जर्मनी या दोन देशांमध्ये १९ महत्त्वाचे सामंजस्य करार आणि ८ महत्त्वाच्या घोषणा झाल्या. भारताचा पासपोर्ट असलेल्यांना जर्मनीत व्हिजामुक्त प्रवास, तसंच भारतीय आरोग्य कर्मचाऱ्यांना नोकऱ्या देण्यासाठी नवा आराखडा यांचा यात समावेश आहे. द्विपक्षीय औद्योगिक सहकार्य वाढवणं, तसंच व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी एका मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाच्या स्थापनेबाबत संयुक्त इरादापत्रावरही आज स्वाक्षरी झाली. प्रधानमंत्री मोदी यांनी मर्ज यांच्या या भारतभेटीचं महत्त्व अधोरेखित केलं.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

चान्सलर मर्ज यांच्या या भेटीदरम्यान संरक्षण, व्यापार, कौशल्य, शाश्वत ऊर्जा आणि नागरिकांमधले संबंध इत्यादी क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवण्याच्या दिशेनं महत्त्वाची पावलं उचलल्याचं प्रतिपादन परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी वार्ताहर परिषदेत केलं. नवीकरणीय ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि हरित आणि शाश्वत विकास भागीदारीअंतर्गत जर्मनीनं १२४ कोटी युरोचं अर्थसहाय्य द्यायची घोषणा केली.

**<><><><>**

जगभरात निर्माण होत असलेल्या संधींचा लाभ भारतीय युवकांनी घ्यावा, यासाठी केंद्र सरकारकडून कौशल्य विकासाच्या क्षेत्रात सुधारणा केल्या जात असल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिली.  नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या विकसित भारत युवा नेता संवादाच्या समारोप सत्रात ते बोलत होते.

विकसित भारत चॅलेंजसाठी ५० लाखांहून अधिक युवांनी नोंदणी केली आणि ३० लाखांहून अधिक युवांनी यात सहभाग घेतला याबद्दल त्यांनी या युवांचं कौतुक केलं. या संवादाच्या आधी त्यांनी या युवांच्या नवकल्पनांच्या प्रदर्शनाला भेट दिली. देशातला तरुण वर्ग किती सर्जनशील आहे हे यातून दिसून येत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

२०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्राचा अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला लोकसभेत मांडला जाणार आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज दिल्लीत वार्ताहर परिषदेत याबाबत माहिती दिली. लोकसभेत अर्थमंत्री निर्मला सीतारामन सकाळी ११ वाजता अर्थसंकल्पाचं वाचन सुरु करतील, असं त्यांनी सांगितलं. २८ जानेवारीला राष्ट्रपतींच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल.

या अधिवेशनाचं पहिलं सत्र १३ फेब्रुवारीपर्यंत चालेल. दुसरं सत्र ९ मार्चला सुरु होईल, ते २ एप्रिलपर्यंत चालेल. त्यामुळे या अधिवेशनात सभागृहांमधे अर्थपूर्ण चर्चा होतील, असं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

**<><><><>**

यंदा रब्बी पिकांखालच्या क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. ९ जानेवारीपर्यंत ६ कोटी ४४ लाख हेक्टरच्या वर रब्बीच्या पेरण्या झाल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ १७ लाख हेक्टरपेक्षा जास्त आहे. ३ कोटी ३३ लाख

हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात गहू, तर २१ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर भातपेरणी झाली आहे. १ कोटी ३६ लाख हेक्टर क्षेत्रात डाळी म्हणजे कडधान्यं, तर ५५ लाख हेक्टरवर तृणधान्यांची लागवड झाली आहे. गळीत, अर्थात तेलबियांच्या लागवडीखालचं क्षेत्र ९६ लाख हेक्टरच्या वर गेलं आहे.

<><><><>

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं आज दिली. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारखी कारणं देत राज्य निवडणूक आयोगानं ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हापरिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले.

<><><><>

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल; पण जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरुपात द्यायला राज्य निवडणूक आयोगानं मनाई केली आहे. १४ जानेवारीपूर्वी लाभार्थींच्या खात्यात डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे तीन हजार जमा होणार, अशा आशयाच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रारी आल्या होत्या. त्यावर राज्य निवडणूक आयोगानं मुख्य सचिवांकडून अहवाल मागवला होता.

याबाबत राज्य निवडणूक आयोगानं काढलेल्या आदेशांमधल्या तरतुदींनुसार निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेली विकासकामं आणि योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवायला परवानगी आहे, असं मुख्य सचिवांनी आपल्या अहवालात कळवलं. त्यानुसार, राज्य निवडणूक आयोगानं हे निर्देश दिले आहेत.

<><><><>

मुंबईच्या सराफा बाजारात चांदी आज किलोमागे तब्बल १४ हजार रुपयांनी महागली. त्यामुळं एक किलो चांदीसाठी २ लाख ६४ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती. सोन्याचे दरही तोळ्यामागे सव्वा ३ हजार रुपयांनी वाढले. त्यामुळं

एक तोळा २४ कॅरेट सोनं १ लाख ४४ हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीला मिळत होतं. तर २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४१ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम द्यावी लागत होती.

सकाळच्या सत्रात घसरलेले शेअर बाजार दुपारनंतर झपाट्यानं वधारले. त्यामुळं व्यवहारादरम्यान ८३ हजारांच्या खाली गेलेला सेन्सेक्स दिवसअखेर ३०२ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार ८७८ अंकांवर बंद झाला. निफ्टी १०७ अंकांनी वधारून २५ हजार ७९० अंकांवर बंद झाला. भारत-अमेरिका व्यापार करार होण्याची आशा, स्वस्तात मिळत असलेल्या समभागांची खरेदी यासारख्या कारणांनी बाजारात आज तेजी होती.

दरम्यान महापालिका निवडणुकांच्या मतदानामुळं गुरुवारी देशातले शेअर बाजार बंद राहणार आहे.

**<><><><><>**

गेल्या वर्षी भारतातल्या इलेक्ट्रिक वाहन बाजारपेठेत एकूण विक्री २३ लाख यूनिटपर्यंत पोहोचली आहे. वाहन पोर्टलच्या आकडेवारीनुसार इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांच्या १२ लाख ८० हजार यूनिट्सची विक्री झाली असून हा आकडा एकूण विक्रीच्या ५७ टक्के इतका आहे. तीनचाकी गाड्यांची विक्री ८ लाख इतकी असून हा आकडा एकूण विक्रीच्या २५ टक्के इतका आहे. चार चाकी वाहनांची विक्री पावणे दोन लाख यूनिट्स इतकी झाली असून कमी वजनाच्या इलेक्ट्रिक वस्तुवाहक वाहनांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे. सर्वाधिक विक्रीत उत्तर प्रदेश सर्वप्रथम असून महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर तर तिसऱ्या क्रमांकावर कर्नाटक आहे.

**<><><><><>**

इराणच्या सत्तेला विरोध करणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज सत्ताधाऱ्यांच्या हजारो समर्थकांनी रस्त्यावर उतरून सरकारच्या समर्थनार्थ निदर्शनं केली. हा अमेरिकन दहशतवादाविरुद्धचा इराणी उठाव असल्याचं निदर्शकांनी सांगितलं. सरकारच्या अख्यत्यारीतल्या प्रसारमाध्यमांनी देशभरातल्या आंदोलनाचं वार्तांकन केलं.

इराणमधे आतापर्यंत शेकडो सरकारविरोधी निदर्शकांचा मृत्यू झाला असून इराणने अमेरिकेसोबत वाटाघाटीचा प्रस्ताव दिल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं. अमेरिका इराणशी चर्चा करण्याचा विचार करत आहे, मात्र इराण सरकार

निदर्शकांवर करत असलेल्या दडपशाहीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेला इराणविरोधात कारवाई करावी लागू शकते असं ट्रम्प म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा २०२५ अंतर्गत राष्ट्रीय क्रीडा प्रशासन राष्ट्रीय क्रीडा संस्था नियमावली २०२६ची अधिसूचना केंद्र सरकारनं आज जारी केली. उत्तम गुणवत्ता असलेल्या खेळाडूंचं समावेशन, सर्वसाधारण सभा आणि कार्यकारी समित्यांची स्थापना, निवडणुकीची प्रक्रिया, तसंच राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवरच्या क्रीडा संस्थांच्या सदस्यांना अपात्र ठरवण्याचे निकष याबाबतचा आराखडा या नियमावलीत आहे.

**<><><><><>**

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा आणि यूपी वॉरियर्स यांच्यात सामना सुरू आहे. नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील मैदानावरच्या या सामन्यात बेंगळुरूच्या संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा युपीच्या ९ व्या षटकात ५ बाद ५२धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**